मानव विकास कार्यक्रम-२०१९-२० करिता मागणी क्रमांक ओ-१, (२०५३१२३१) दत्तमत या लेखाशीर्षाखाली निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्र.:- माविका -२०१९/प्र.क्र.५२ /का.१४१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:- २ मे, २०१९.

वाचा:-

१) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक:माविमि २०१०/ प्र.क्र.८१ /का.१४१८, दि.१९जुलै २०११.

२) वित्त विभाग,परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि.०१, एप्रिल २०१९.

शासन निर्णय

मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर राबवून सदर कार्यक्रमाची व्याती वाढविण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन(१) दिनांक १९ जुलै,२०११ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. मानव विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व याअंतर्गत निवडलेल्या तालुक्यांना पुरेसा निधी प्राप्त व्हावा म्हणून सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून सदरचा कार्यक्रम राज्यातील २३ जिल्हयातील (नवनिर्मित पालघरसह) अतिमागासलेल्या १२५ तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

२. मानव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षासाठी “मागणी क्रमांक ओ-१, २०५३ जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना, पंचवार्षिक योजनाअंर्तगत योजना, ०४ आयुक्त, औरंगाबाद (०४) (०१) मानव विकास निर्देशांक वृद्धी करणे (२०५३ १२३१) दत्तमत” या लेखाशीर्षाअंर्तगत अर्थसंकल्पित तरतूद ₹ ३५४००.०० लक्ष पैकी अंतरिम अर्थसंकल्प २०१९-२० करिता ₹ ११६६७.००लक्ष निधी प्राप्त झाला आहे. अर्थसंकल्पिय प्रणालीवर चार महिन्याकरिता (एप्रिल ते जुलै) रु.११६.६७कोटी निधी वाटपासाठी उपलब्ध झालेला असून सदर निधी पेकी उद्दिष्ट ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दीष्टाखालील निधी वगळता उर्वरित उद्दिष्टांसाठी खालीलप्रमाणे आयुक्त, मानव विकास, औरंगाबाद यांना वितरित करण्यात येत आहे.

(रु.हजारात)

बाब	उद्दीष्ट	अर्थसंकल्पिय तरतूद (२०१९-२०)	अंतरिम अर्थसंकल्पिय तरतूद (एप्रिल ते जुलै)	वितरणासाठी बीडीएसवर उपलब्ध निधी			
				एप्रिल	मे	जून	जुलै
सर्वसाधारण योजना	०१-वेतन	९१०००.०	३०३३५.००	१५१६७.००	५०५६.००	५०५६.००	५०५६.००
	०६-दूरध्वनी,वीज व पाणी शुल्क	११०.०	३६.००	१८.००	६.००	६.००	६.००
	११-देशांतर्गत प्रवास खर्च	५५००.०	१८३५.००	९१७.००	३०६.००	३०६.००	३०६.००
	१३-कार्यालयीन खर्च	१४०००.०	४६६७.००	२३३३.००	७७८	७७८	७७८
	१४-भाडेपट्टी व कर	२०००.०	६६६.००	३३३.००	१११.००	१११.००	१११.००
	१७-संगणकावरील खर्च	१०४०.०	३४७.००	१७३.००	५८.००	५८.००	५८.००
	२०-इतर प्रशासकीय खर्च	१००.०	३५.००	१७.००	६.००	६.००	६.००
	३६-सहायक अनुदान वेतनेतर	१.०	०.०	०.००	०.००	०.००	०.००
	५०-इतर खर्च	६२४९.०	२०८३.००	१०४२.००	३४७.००	३४७.००	३४७.००
एकूण		**१२००००.००**	**४०००४.००**	**२००००.००**	**६६६८**	**६६६८.००**	**६६६८.००**

३. आयुक्त, मानव विकास, औरंगाबाद यांना वितरीत करण्यात आलेला निधी “मागणी क्र. ओ-१, २०५३, जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०४ आयुक्त, औरंगाबाद (०४) (०१) मानव विकास निर्देशांक वृध्दी करणे (२०५३१२३१), ०१-वेतन,०६-दूरध्वनी,वीज व पाणी शुल्क ,११-प्रवास खर्च, १३- कार्यालयीन खर्च, १४ भाडेपट्टी व कर, १७ संगणकावरील खर्च , २० इतर प्रशासकीय खर्च, ५०-इतर खर्च व ३६-सहायक अनुदान वेतनेतर” या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०या वित्तिय वर्षात खर्ची घालण्यात यावा व विहित मर्यादेत खर्च करावा. त्याचप्रमाणे मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. वर नमूद केलेल्या लेखाशीर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेला खर्च याबाबत मेळ घालून प्रत्येक महिन्यात केलेल्या खर्चाचा अहवाल शासनास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

५. या आदेशान्वये वाटप करण्यात येत असलेले अनुदान हे मासिक रोख प्रवाह विवरणपत्र (Cash flow statement) नुसार वितरित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय, महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम-२०१५ निधी वितरण याविषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९ / प्र.क्र.४४ /अर्थ-३, दि. ०१.०४.२०१९ मधील तरतूदी / निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५०२१५०५१८३६१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.05.02 15:17:00 +05'30'

(वि.फ. वसावे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२,नागपूर,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) , महाराष्ट्र-१, मुंबई,
४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
५) आयुक्त,मानव विकास,बाबा पेट्रोल पंपाजवळ,अदालत रोड ,औरंगाबाद
६) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, औरंगाबाद
७) उपायुक्त (मा.वि.), मानव विकास आयुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद
८) वित्त विभाग, अर्थ-१६,मंत्रालय,मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०) कार्यासन अधिकारी (का .१४२४), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) निवडनस्ती/ का-१४१८